दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
संविधानाच्या माध्यमातुन लोकशाही जपणारे बुलंद वर्तमानपत्र

हां मैंने सुना है **कलम** बोलती है।

Website: atulyamaharashtra.com | RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 | Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ : मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप | उप संपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

बीड- महाराष्ट्र • बीड, गुरुवार, दि. 10 ऑक्टोंबर 2024 | • अंक क्र. 150 | • वर्षे 2 रे | • मुल्य 3 रुपये | • पृष्ठे 4



# आष्टी मतदारसंघात माजी मंत्री सुरेश धस यांच्या कामांचा धडाका

**आज आष्टी तालुक्यात 24 कोटी 46 लक्ष रुपयांच्या विविध विकास कामांचे भूमीपूजन**

सध्या केव्हा आचार संहिता घोषित होतीये याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागेलेले असताना माजी मंत्री सुरेश धस यांच्या कामांचा धडाका सुरूच आहे, ग्राउंड लेव्हल वर जाऊन काम करणार व्यक्तिमत्व म्हणून धस जिल्हाभरात प्रसिद्ध आहेत, आपल्या वेगळ्या कामाच्या आणि सडेतोड वृत्तीमुळेही त्यांचा परिचय ही तळागाळातील लोकांची जोडला गेलेला असतो.

आष्टी प्रतिनिधी

आष्टी मतदारसंघात माजी मंत्री सुरेश धस यांनी विविध विकास कामांचा गेल्या दोन ते तीन दिवसापासून कोट्यवधी रुपयाच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळ्याचा धडाका लावला आहे. आज आष्टी तालुक्यात 24 कोटी 46 लक्ष रुपयांच्या विविध विकास कामाचे भूमिपूज माजी मंत्री सुरेश आण्णा धस यांच्या शुभहस्ते होणार आहे. आष्टी तालुक्यात 24 कोटी 46 लक्ष रुपयांचा विविध विकास कामांचा भूमिपूजन समारंभ माजी मंत्री सुरेश धस यांच्या हस्ते गुरुवार, 10 ऑक्टोबर रोजी सकाळी 8 वा. मातकुळी मातकुळी कर्हेवडगाव रस्ता भूमीपूजन 4 कोटी 56 लक्ष,सकाळी 8:45 वा.भातोडी विविध विकासकामांचे भूमीपूजन 3 कोटी 29 लाख सकाळी 9:30 वा.आष्टा (ह.ना.) शिंदे वस्ती रस्ता भूमीपूजन 3 कोटी 83 लाख,सकाळी 10 वा.,आंधळेवाडी रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन 4 कोटी 8 लाख,सकाळी 11 वा.मुर्शदपूर माऊली मंदिर रस्ता भूमीपूजन 5 कोटी रुपये पिंपरी रोड भूमीपूजन सिमेंट रस्ता 4 कोटी आदी विकास कामांचं भूमिपूजन होणार आहे. या भूमिपूजन सोहळ्यासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे आवाहन भारतीय जनता पार्टी पदाधिकारी यांनी केले आहे.

# पालकमंत्री धनंजय मुंडेंचे बीड जिल्हा वासीयांना मोठे गिफ्ट

## यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेतून बीड जिल्ह्यात तब्बल 28 हजार घरकुलांना शासनाची मंजुरी



जिल्ह्याच्या इतिहासात प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणावर घरकुलांना मंजुरी!

मुंबई वृत्तसंस्था

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांनी बीड जिल्हा वासीयांना ऐन सणासुदीच्या काळात मोठे गिफ्ट दिले असून, इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेतून जिल्ह्यासाठी तब्बल 28 हजार घरकुले मंजूर करण्यात आली आहेत. याबाबतचे शासन निर्णय आज निर्गमित करण्यात आले आहेत. यामध्ये एका शासन निर्णयाद्वारे 17081 तर दुसऱ्या शासन निर्णयाद्वारे 9941 अशा एकूण 28 हजार घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे. तर पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री श्री अतुल सावे यांचे याबद्दल आभार मानले आहेत. विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील गरजू नागरिकांना यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेतुन स्वतःचे पक्के घर बांधण्यासाठी 1 लाख 20 हजार रुपये निधी दिला जातो.

बीड जिल्ह्यातील तालुकानिहाय प्राप्त प्रस्ताव मान्यतेसाठी पाठवण्याबाबत जिल्हास्तरीय समितीने निर्णय घेऊन प्राप्त प्रस्तावांची यादी राज्य शासनास सादर केली, त्यानुसार पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या पुढाकारातून तब्बल 28 हजार घरकुलांना एकाच वेळी मंजुरी देण्यात आली आहे. बीड जिल्ह्यात तालुकानिहाय आकडेवारी पाहता, घरकुलांसाठी एकत्रित पणे इतक्या मोठ्या प्रमाणात घरकुल मंजूर करण्यात आले आहेत, धनंजय मुंडे यांच्या आग्रही भूमिकेमुळे हे होऊ शकले, असे बोलले जात आहे. जिल्ह्याच्या इतिहासात इतक्या मोठ्या संख्येने एका योजनेतून घरकुलांना मंजुरी मिळण्याची ही पहिलीच वेळ असून, यामध्ये सर्व तालुक्यांना न्याय देण्यात आला आहे.

# अध्यात्मिक सहवासाने मिळाले नवचैतन्य : राजेभाऊ फड

## राजेभाऊ फड झाले श्री क्षेत्र भगवानगड, नारायणगड, गहिनीनाथ गडासह गोपीनाथ गडावर नतमस्तक

परळी प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी अनेक कार्यकर्त्यांना सोबत घेऊन, जिल्हातील अनेक गडाचे

यथोचित दर्शन घेतले. नियोजित दौऱ्याच्या सुरुवातीस सकाळी परळी तालुक्यातील कन्हेरवाडी येथील माजी आमदार स्व.रघुनाथराव मुंडे यांच्या समाधीस्थळी नतमस्तक झाले यावेळी गावातील अनेक नागरिकांसह कार्यकर्ते उपस्थित होते. त्यानंतर पांगरी(गोपीनाथ गड) येथील गोपीनाथ गडावर जाऊन स्व.लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या समाधीचे दर्शन घेऊन राजेभाऊ फड पुढे मार्गस्थ झाले त्यानंतर, श्री क्षेत्र भगवानगड येथील राष्ट्रसंत भगवान बाबांच्या चरणी नतमस्तक झाल्या नंतर, बाबांच्या दर्शनाने व गडाच्या अध्यात्मिक वारसा व सहवासाने नवचैतन्य प्राप्त झाले सामाजिक व राजकीय कार्य करण्याची ऊर्जा बाबांच्या दर्शनाने मिळाली असे प्रतिपादन राजेभाऊ फड यांनी केले.

त्यानंतर श्री क्षेत्र नारायणगड सह गहिनीनाथ गड येथेही ते मनोभावे नतमस्तक झाले. लोकसेवा माझ्या हातून घडावी यासाठी मी समाजकारण आणि राजकारणात आलो आहे. मी हाती घेतलेले जनसेवेचे व्रत अखंडपणे पुढे चालू राहावे यासाठी नवशक्ती मिळावी असे साकडे मी संतचरणी घातले असल्याचेही त्यांनी सांगितले. राजेभाऊ फड यांच्या आजच्या दौऱ्यात पक्षाचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते.





## लोकसेवार्थ

# व्यसनमुक्त समाज निर्मितीसाठी झटणारी संस्था 'दिशा'

**एखाद्या गोष्टीचं व्यसन जडतं म्हणजे नेमकं काय होतं, याचं उत्तर कोणाकडेच नाही. एखादी व्यक्ती सतत दारु पिते, ड्रग्स घेते, धूम्रपान करते म्हणजे ती व्यसनी आहे, असा सर्वसाधारण विचार प्रचलित आहे. यामुळे त्या व्यक्तीकडे बघण्याचा कुटुंबाचा व समाजाचा दृष्टिकोन बदलतो. 'व्यसन' हा एक आजार असून व्यसनमुक्तीसाठी डॉक्टरांचा सल्ला आणि उपचार सर्वत्र उपलब्ध आहेत. कल्याणजवळ गोवेली, टिटवाळा येथे दिशा सामाजिक सेवा संस्था गेली अनेक वर्षे व्यसनाधीन व्यक्तींना व्यसनमुक्त करण्यासाठी विशेष प्रयत्न करत आहे. दिशा सामाजिक सेवा संस्था या नावातच व्यसनामुळे दिशाहीन झालेल्या लोकांना योग्य दिशा दाखवणे हेच दिशा चे स्वप्न आहे. योग्य मार्गदर्शन, जाणीवजागृती, उपचार आणि पुनर्वसन हेच स्वप्न साकार करण्यासाठी सामाजिक कार्यात उचललेलं हे पाऊल आहे. व्यसन हा एक मानसिक आजार असल्यामुळे त्याला मानसिक शुद्धी करावी लागते. अशातच समाजाने नाकारलेल्या व्यसनामुळे आयुष्य हरवून बसलेल्या व्यक्तींना आधार देण्यासाठी त्यांना योग्य मार्ग मिळवून देण्यासाठी दिशा सामाजिक सेवा संस्था हा एक उत्तम पर्याय आहे.**

दिशा सामाजिक सेवा संस्थाची स्थापना २०११ मध्ये झाली.प्रथमतःही संस्था कल्याण येथे सुरू झाली. दिशा सामाजिक सेवा संस्थेची स्थापना श्री. राजेंद्र कुऱ्हाडे यांनी केली आहे. साधने आणि संधी उपलब्ध नसल्यामुळे असुरक्षिततेत जगणाऱ्या सामान्य माणसाचे जीवनमान सुधारणे ही दिशा सामाजिक सेवा संस्थाची संकल्पना होती. हे भारतातील मद्यविकार (दारू व्यसन –मादक पदार्थांचे सेवन आणि मानसिक विकारांवरील उपचार सुविधा केंद्र आहे. हे भारतातील प्रथमच अनेक सायकोथेरपी कार्यक्रम असलेले एकमेव उपचार केंद्र आहे. ह्या व्यसनमुक्ती केंद्रात व्यसनाधीन व्यक्तींसाठी विविध उपक्रम राबवले जातात.निरनिराळ्या सत्रांमधून संस्थेत दाखल झालेल्या व्यसनाधीन व्यक्तींमध्ये सामाजिक, कौटुंबिक जागरूकता निर्माण केली जाते. रोल प्ले थेरपी सारख्या थेरपीमधून स्वतःमधील व दुसऱ्या व्यक्तींमधील उणीवा दाखवून त्यावर कसे काम करावे, आपल्या स्वभावातील दोष काय आहेत व ते कसे काढून टाकावेत ह्यासाठी उत्तम मार्गदर्शन केले जाते.व्यसनातून मुक्त होणाऱ्या शरीराला संतुलित आहाराची गरज असते. येथील जेवण पौष्टिक, चवदार आणि अतिशय स्वच्छतेने तयार केलेले असते. इथे बरे झालेल्या रुग्णांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी संतुलित कार्बोहायड्रेट्ससह उच्च प्रथिने, कमी चरबीयुक्त संतुलित आहार दिला जातो.

दिशा सामाजिक सेवा संस्थेत सर्व सण अत्यंत उत्साहात साजरे केले जातात. तसेच येथे दाखल असेलेल्या व्यक्तींचे वाढदिवसही मोठ्या दिमाखात साजरे केले जातात. माणसातील माणूसपणा आणि आशावाद जागवणे, समाजाने नाकारलेल्या व्यसनी, मनोरुग्णांना परत माणसात आणणे आणि आपल्या पायांवर उभे करणे हे सामाजिक कार्य दिशा सामाजिक सेवा संस्था, गेली १२ वर्षे उकृष्टपणे करीत आहे हे खरेच एक प्रकारचे सामाजिक व्रतच म्हणता येईल.

## अक्षरधारा

### मुक्तछंदी कवी अनिल

आधुनिक मराठी कवी आत्माराम रावजी देशपांडे,'अनिल' या टोपण नावाने काव्यलेखन करत. त्यांचा जन्म मुर्तिजापूरचा. बी.ए.,एलएल. बी. झाल्यावर त्यांनी काही काळ न्यायाधीश म्हणून काम केले. नंतर नागपूरला समाजशिक्षण-विभागाचे संचालक म्हणून ते रुजू झाले.पुढे दिल्लीला नॅशनल फंडामेंटल एज्युकेशन सेंटरचे संचालक म्हणून त्यांची नेमणूक झाली.प्रसिद्ध मराठी लेखिका व टीकाकार कुसुमावती देशपांडे या त्यांच्या पत्नी होत.फुलवात हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह (१९३२). त्यात १९२० ते १९३१ या कालखंडातील त्यांच्या कविता आहेत. या कवितांत प्रेमजीवनातील उत्कट अनुभूतींचा गूढ व प्रतीकात्मक आविष्कार आढळतो. प्रेम आणिजीवन (१९३५), भग्नमूर्ति (१९४०) व निर्वासित चिनी मुलास (१९४३) ही त्यांची खंडकाव्ये मुक्तच्छंदातच रचिलेली आहेत. पेर्ते व्हा (१९४७) या काव्यसंग्रहात अनिलांच्या १९३२ ते १९४७ मधील स्फुट कविता आहेत. १९४७ ते १९६१ मधील कविता 'सांगाती' (१९६१) ह्या काव्यसंग्रहात आहेत. प्रेमजीवनाची उदात्तता, सामाजिक उद्बोधन व व्यापक मानवतावाद हे त्यांच्या आशयाचे विशेष आहेत. त्यांच्या काव्यात 'रविकिरणमंडळा' च्या काव्य संकेतां विरुद्ध झालेली प्रतिक्रिया आढळते आणि काव्य विचारात अशा प्रतिक्रियेबरोबर नव काव्यातील काही प्रवृत्तींचा निषेध दिसून येतो. मुक्तच्छंद हा अनिलांच्या पुरस्काराचा, प्रयोगशीलतेच्या व जिव्हाळ्याचा विषय आहे. 'मुक्तछंद', 'मुक्तछंदः वादाचा थोडा इतिहास व विचार' आणि 'मुक्तछंदाची आवश्यकता' हे त्यांचे या संदर्भातील महत्त्वाचे लेख. भग्नमूर्ति या खंडकाव्याच्या दुसऱ्या आवृत्तीत (१९६५) 'मुक्तछंदाचे वाचन' व 'मुक्तछंद का म्हणून?' या विषयांवरील परिशिष्टे आहेत. त्यांचे समीक्षालेखन थोडे आहे व ते काही लेखांतून व भाषणांतून विखुरलेले आहे. १९६६ मधील विदर्भ साहित्य संमेलनाचे व १९५८ मधील मालवण येथील महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. १९६४ पासून ते साहित्य अकादेमीचे सभासद आहेत. या संस्थेने त्यांच्या भग्नमूर्ति या खंडकाव्याची अन्य भारतीय भाषांतील अनुवादासाठी निवड केली आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळाचेही ते सभासद देखील आहेत.




## शब्दार्थ

Google

गुगल हे असं सर्च इंजिन आहे जे सर्वसामान्यांपासून सगळेच त्याचा वापर करतात. गुगलमुळे तुमच्या आयुष्यातील अनेक प्रश्नांची उत्तरं अगदी सहज सुटतात. कोट्यवधी लोक गुगलचा रोज वापर करतात. पण रोज इतक्या मोठ्या प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या गुगलचा फुल फॉर्म तुम्हाला माहित आहे का? आपण दैनंदिन जीवनात रोज गुगलचा वापर करतो. पण, त्याचा फुल फॉर्म फार क्वचितच लोकांना माहित असेल. तर, Google चा फुल फॉर्म Global Organization of Oriented Group Language of Earth असा अर्थ आहे. याचा शॉर्ट फॉर्म गुगल आहे.

संकलन –संयोजन
सुबोध रणशेवरे
संपर्क -९८३३१४६३५६
इमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

## संपादकीय

# अणांचा विनोद!

काहीही साजरे करायची सवय एकदा का लागली आणि तीत सहभागासाठी विचारशून्य हौशे-गवशे तयार असतील तर अपयशाचेही ढोल पिटता येतात. गरज असते ती अपयशातच खरे यश कसे आहे ते गळी उतरवण्याच्या चातुर्याची. हे कसे साधायचे याचा उत्तम वस्तुपाठ म्हणजे नुकतेच पूर्ण झालेले 'फाईव्ह जी' लिलाव. आठवडाभराच्या प्रक्रियेनंतर ते सोमवारी सायंकाळी संपूर्ण झाले आणि अपेक्षेप्रमाणे मुकेश अंबानींची 'जिओ' ही यातील सर्वाधिक बोलीची कंपनी ठरली. या कंपनीची बोली सुमारे ८८ हजार कोटी रुपयांची होती. गेल्या काही वर्षांतील 'जिओ'चा झपाटा लक्षात घेता यात धक्का बसावे असे काही नाही. यापाठोपाठ होती 'एअरटेल'. या कंपनीची बोली होती ४३ हजार कोटी रुपयांची. जागतिक दूरसंचार बाजारातील बलाढ्य पण भारतात जायबंदी 'व्होडाफोन' ही अवघ्या सुमारे १८ हजार कोटी रुपयांच्या बोलीने तिसऱ्या क्रमांकावर होती आणि या क्षेत्रातील नवा खेळाडू असलेल्या 'अदानी'ची बोली तर अवघ्या २१२ कोटी रुपयांची होती. पहिल्यापेक्षा दुसऱ्याची बोली निम्म्या रकमेची आणि दुसऱ्याच्या अर्धी तिसऱ्याची आणि चवथ्या नवख्याची तर तिसऱ्याच्या किमान आठपट कमी रकमेची. यातून केंद्राच्या झोळीत दीड लाख कोटी रु. इतकी रक्कम मिळेल. 'आतापर्यंतची ही सर्वात मोठी दूरसंचार लिलाव कमाई' असे याचे वर्णन होत असून सरकारी साजिंदे या यशोत्सवासाठी आपापल्या समाजमाध्यमी पिपाण्या फुंकताना दिसतात. यशस्वी न ठरताही यशोत्सव कसा साजरा करता येतो याचे हे उदाहरण. दोन स्तरांवर हा विषय समजावून घ्यायला हवा.

पहिला मुद्दा सरकारदरबारी जमा झालेल्या वा होणाऱ्या रकमेचा. या 'फाईव्ह जी' लिलावातून सरकारला प्रत्यक्षात अपेक्षित होती ४ लाख ३० हजार कोटी इतकी प्रचंड रक्कम. पण आठवडाभराच्या लिलाव दळणानंतरही एकूण रक्कम आहे अवघी १.५ लाख कोटी रु. इतकीच. म्हणजेच उद्दिष्टाच्या निम्म्यापेक्षाही किती तरी कमी. ती सरकारदरबारी जमा होईल पुढील २० वर्षांत. दूरसंचार कंपन्यांवर मेहरबान सरकारने ही रक्कम २० हप्त्यांत भरण्याची सोय या कंपन्यांना दिलेली असल्याने वर्षाला जेमतेम १३,३६५ कोटी रु. सरकारच्या हाती पडतील. दूरसंचारातून केंद्रीय अर्थसंकल्पात निर्मला सीतारामन यांना अपेक्षित असलेली रक्कम आहे सुमारे ५२ हजार कोटी रु. या लिलावातून मिळणारे १३ हजार कोटी रुपये वगळता अन्य कोठून ही रक्कम अर्थसंकल्पाच्या तिजोरीत येणार आहे हे कळण्यास मार्ग नाही. ही रक्कम अपेक्षेप्रमाणे न आल्यास दूरसंचारातून मिळणारा महसूल कमी होणार हे उघड आहे. ही इतकी तुलनेने फुटकळ रक्कम भरून मिळवलेल्या 'फाईव्ह जी' परवान्यांत संबंधित कंपन्यांना अन्य कोणताही आकार द्यावा लागणार नाही. इतक्या रकमेत संपूर्ण 'फाईव्ह जी' बाजारपेठ या कंपन्यांस मिळेल. वरवर पाहता यात गैर काय असा प्रश्न पडेल.

हा दुसरा मुद्दा. गैर (?) या संदर्भातील इतिहासात आहे. आजमितीस देशभरात शंभर कोटींहून अधिक दूरसंचार ग्राहक आहेत. लोकसंख्या आणि दूरसंचार गुणोत्तरात भारत आघाडीवर असेल इतकी आपली ग्राहकसंख्या. या इतक्या ग्राहकसंख्येसाठी सुमारे ४.३० लाख कोटी रुपयांचा 'फाईव्ह जी' महसूल येणे अपेक्षित असताना तो जेमतेम १.५ लाख कोटी रुपये इतका(च) येत असेल तर १२ वर्षांपूर्वी दूरसंचार ग्राहकसंख्या जेमतेम ११ कोटी इतकीच होती त्या वेळी मात्र 'टू जी'च्या लिलावातून १.७६ लाख कोटी रु. मिळाले असते अशी अपेक्षा कितपत योग्य? हा यातील खरा प्रश्न यासाठी की ही कथित १.७६ लाख कोटी रु. रक्कम उभारली न गेल्यामुळे तत्कालीन सरकारच्या काळात दूरसंचार घोटाळा झाल्याचा निष्कर्ष काढला गेला, तो किती अविश्वसनीय होता हे लक्षात यावे म्हणून. तो 'लिलाव' होता 'टू जी' तंत्रज्ञानाचा. पण लिलावाऐवजी 'प्रथम येणारास प्राधान्य' या तत्त्वावर संबंधित कंपन्यांस कंत्राटे दिली गेली आणि त्यामुळे सरकारला अपेक्षित १.७६ लाख कोटी रु. इतके उत्पन्न मिळाले नाही, असा जावईशोध त्यावेळचे देशाचे महालेखापाल माननीय विनोद राय यांनी मांडला. जे उत्पन्न मिळेल हीच मुळात कल्पना होती ते उत्पन्न प्रत्यक्षात मिळाले नाही म्हणून झालेले नुकसान मात्र खरे असे मानले गेले. त्यावर तत्कालीन विरोधी पक्ष भाजपने रान उठवले. अण्णा हजारे यांच्यापासून ते बाबा रामदेव यांच्यापर्यंतचे महान अर्थशास्त्री त्यानंतर मैदानात उतरले आणि त्यांनी भ्रष्टाचारमुक्तीची हाक दिली. पाठोपाठ आला मेणबत्ती संप्रदाय. यातील बव्हंश मंडळीत मुळात आर्थिक साक्षरतेची बोंब! त्यात कोणी कोणाविरोधात भ्रष्टाचाराचा आरोप केला रे केला की त्यावर विश्वास ठेवण्याची सांस्कृतिक सवय!! म्हणजे आधी मर्कट.. तशीच अवस्था.

ती समस्त भारतवर्षांने त्या वेळी अनुभवली. दिल्लीतील रामलीला काय, त्यात तिरंगा फडकावणारे हे उत्सवी भ्रष्टाचारविरोधी काय, राजकारणात भातुकली घालून बसलेला 'आम आदमी पक्ष' काय सगळेच हास्यास्पद होते! या सर्वांनी दूरसंचार घोटाळ्याचा असा काही फुगा फुगवला की तत्कालीन दूरसंचारमंत्री, द्रमुकचे राजा आदींना तुरुंगवास भोगावा लागला. परंतु प्रत्यक्षात हा दूरसंचार घोटाळा म्हणजे नवे बोफोर्स प्रकरण निघाले. नुसताच धुरळा. हाती काहीच नाही. तथापि त्याच मध्यमवर्गाने आणि त्याच नैतिक मध्यमवर्गाचे तत्कालीन नायक अण्णा हजारे आदींनी आताच्या 'फाईव्ह जी' लिलावासही तीच नैतिक फुटपट्टी लावायला हवी. ती लावल्यास 'फाईव्ह जी' घोटाळा 'टू जी'पेक्षा साधारण दुप्पट आकाराचा ठरतो. तसे काही कोणी बोलताना दिसत नाही. वास्तविक 'टू'पेक्षा 'फाईव्ह' ही संख्या मोठी हे इतके सामान्यज्ञान सर्वास असायला हरकत नाही. तेव्हा त्यानुसार 'टू जी'मध्ये जी काही जमा झाली त्यापेक्षा किती तरी पट अधिक जमा 'फाईव्ह जी' लिलावात व्हायला हवी, हेही साधे तर्कट. तेही न वापरण्याइतका बौद्धिक आळस असल्यामुळे 'टू जी'च्या कथित घोटाळ्यातील रकमेपेक्षाही कमी 'फाईव्ह जी' लिलावाची जमा कशी इतका साधा प्रश्नही पडू नये हे आश्चर्य.













दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# बालपणी ठरवलेलं स्वप्न अखेर आज पूर्ण केलंच, झाली स्वतःच्या हक्काच्या घराची मालकीण!



मुंबई- मराठी अभिनेत्री रुपाली भोसले स्टार प्रवाह वाहिनीवरील 'आई कुठे काय करते' या मालिकेतून घराघरात लोकप्रिय झाली. या मालिकेमध्ये रुपालीने संजनाची भूमिका साकारली आहे. रुपाली बिग बॉस २ मध्ये सुद्धा सहभागी झाली होती. रुपालीने तिच्या आयुष्यातील खडतर प्रवासाबद्दल एका मुलाखतीत सांगताना म्हणाली होती की, तिचा जन्म वरळीत झाला असून संपूर्ण बालपण मुंबईत गेलं. तिची नववीची परीक्षा नुकतीच झाली होती आणि त्यावेळी एक स्किम आली होती. तिच्या मोठ्या काकाने त्या स्किममध्ये पैसे भरायला सांगितले. तेव्हा तिच्या आईने सगळे जमवून ठेवलेले पैसे दिले आणि त्या स्किममध्ये ते पैसे बुडाले. त्यामुळे तिचं शिक्षण अर्धवट राहिलं, राहतं घर विकावं लागलं. मात्र, रुपालीने कधीच हार मानली नाही. शेवटी तिने मेहनतीच्या बळावर स्वतःचं घर घेऊन दाखवलंच! अभिनेत्री रुपाली भोसलेनं नुकतंच स्वतःच्या मालकीचं हक्काचं घर घेतलं आहे. कालच तिने या घराची वास्तुशांती केली. त्याचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून कलाकारांनीसुद्धा तिला शुभेच्छा दिल्या आहेत. रुपालीच्या घराच्या नेमप्लेटवर 'प्रकाश प्रज्ञा संकेत भोसले' असं तिच्या बाबांचं, आईचं आणि भावाचं नाव लिहिलेलं आहे. अभिनेत्रीच्या घरातील देव्हारा अतिशय सुंदर आहे. रुपालीने तिला मिळालेले पुरस्कार एक एक कप्प्यात रचून ठेवले आहेत. रुपालीला नवीन घरानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी अनेक कलाकार पोहोचले होते. वास्तुशांतीनिमित्त तिने भजन ठेवलं होतं. त्या भजनात अभिनेता सुशांत शेलार गुंग झाला होता. त्याचासुद्धा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होतोय. 'आई कुठे काय करते' फेम गौरी कुलकणीर्ला सुद्धा रुपालीच्या या स्वप्नपूतीर्मुळे अश्रू अनावर झाले होते. अभिनेत्रीने वयाच्या १५ व्या वषार्पासून काम करायला सुरुवात केली. तिचं बालपण अपार कष्टात गेलं असल्यामुळे तिने तेव्हाच ठरवलं होतं की, असे दिवस पुन्हा तिच्या कुटुंबाच्या आयुष्यात येणार नाहीत आणि ते तिने आज खरं करून दाखवलं.

# पटकथेत फसलेला भव्यपट



पटाबाबत निश्चित म्हणता येईल. अयान मुखर्जी दिग्दर्शित ब्रह्मास्त्र पाहतानाही उत्तम व्हीएफएक्स वापरून केलेली चांगली गोष्ट पाहता येईल अशी अपेक्षा होती. काही प्रमाणात ती पूर्ण करण्यात यशस्वी ठरलेला ब्रह्मास्त्र हा चित्रपट प्रेमकथेत अधिक फसला होता. कल्की २८९८ एडीमध्ये महाभारताचे संदर्भ घेऊन कल्की अवताराची कथा सांगण्यासाठी व्हीएफएक्सच्या आधारे उभारलेलं एक काल्पनिक विश्व, देशभरातील प्रसिद्ध कलाकारांचा केलेला वापर अशा सगळ्या गोष्टी जमवून आणण्यात दिग्दर्शकाला यश आलं आहे. पण, कुठल्याही भव्य चित्रपटाचा डोलारा हा त्याच्या कथेचा पाया किती मजबूत आहे यावर अवलंबून असतो, इथे मात्र या अतिखर्चीक साय-फायपटाची पुरती भंबेरी उडाली आहे. कुठलीही काल्पनिक कथा मग ती पुराणकथेच्या आधारावर असो वा स्वातंत्र्यकाळातील असो, व्हीएफएक्सच्या आधारे ते विश्व प्रेक्षकांसमोर कसं उभं करायचं आणि त्यात त्यांना गुंतवून कसं ठेवायचं हे गणित आत्तापर्यंत दिग्दर्शक एस. एस. राजामौली यांना अचूक जमलेलं आहे. कथेचा कल्पनाविस्तार कुठल्याही पद्धतीचा असला तरी भारतीय मानसिकतेचा विचार करत त्याची बांधेसूद मांडणी आवश्यक असते, त्यानुसार संगीतयोजनाही असायला हवी. त्याबाबतीत नाग अश्विन यांचा चित्रपट अगदीच ढेपाळला आहे. महाभारतात कुरुक्षेत्रावर लढलं गेलेलं युद्ध, अश्वत्थामाच्या हातून उत्तरा आणि तिच्या गभार्तील बाळाची ब्रह्मास्त्राने झालेली हत्या, परिणामी भगवान श्रीकृष्णांनी अश्वत्थाम्याला दिलेला शाप इथून या चित्रपटाची सुरुवात होते. कैक वर्षांनी पृथ्वीवर कलियुगातील पाप, अन्याय यांची चरमसीमा गाठली जाईल तेव्हा विष्णूंचा कल्की अवतार जन्माला येईल. तेव्हा त्या नव्या अवताराला वाचवण्यासाठी तुला लढावं लागेल, असं श्रीकृष्ण अश्वत्थाम्याला सांगतात. त्यानंतर कथा थेट सहा हजार वर्षांनंतरच्या काशी क्षेत्रात येऊन स्थिरावते. लोकांचे पाप धुता धुता आटलेली गंगामैय्या, वैराण वाळवंट झालेलं काशी. या पृथ्वीवरचं जिवंत असं शेवटचं शहर. योगायोग म्हणजे या शहरातही भारत आणि इंडियाप्रमाणे दोन भाग आहे. काशीमध्ये अन्नपाणी, घरदार कशाचा पत्ता नसलेली लोकं इतस्ततः भटकतायेत. याच शहराच्या मधोमध उलट्या पिरॅमिडच्या आकाराचं कॉम्प्लेक्स नावाचं एक वेगळंच संस्थान आहे. सुप्रीम यास्कीनने वसवलेलं हे शहर. पृथ्वीवरचे सगळे नैसर्गिक स्त्रोत शोषून घेऊन आपल्यापुरती हिरवाई जपणाऱ्या या एकमेव शहरात जायचं तर एक कोटी युनिट्स लागतात आणि बंडखोर लोकांना पकडून कॉम्प्लेक्सच्या कमांडरकडे त्यांना सोपवल्यावर युनिट्स माणसांच्या खात्यात जमा होतात. वाईट शक्तींचा महानायक असलेल्या सुप्रिम यास्कीनची एक वेगळी कथा आहे. कल्कीचा जन्म होऊ नये, आपणच महाशक्ती व्हावं म्हणून त्याची सुरू असलेली धडपड, त्याचा भाग म्हणून बंदी बनवल्या जाणाऱ्या गर्भवती बायका, या बायकांमधली एक महत्त्वाची व्यक्तिरेखा सुमती, कल्कीला जन्म देणाऱ्या मातेच्या शोधात असलेलं आणि कॉम्प्लेक्सच्या नजरेपासून दूर असलेलं बंडखोरांचं शंभाला शहर अशा कित्येक उपकथा आणि व्यक्तिरेखा यात गुंफलेल्या आहेत. त्यात भैरव नामक आणखी एक महत्त्वाची व्यक्तिरेखा आहे. त्याला येनकेनप्रकारेण कॉम्प्लेक्समध्ये प्रवेश मिळवायचा आहे. बाकी तो चांगला की वाईट, त्याचा वरच्या या कथानकाशी काय संबंध? अश्वत्थामा या सगळ्यात श्रीकृष्णाने दिलेल्या जबाबदारीशी कसा जोडला जातो? हे सगळं समजून घेण्यासाठी हा चित्रपटच पाहायला हवा. महाभारताच्या कुरुक्षेत्रापासून सुरुवात होऊन सहा हजार वर्षांनंतर काशीमध्ये कथानक जोडताना येणारे अनेक उपकथांचे धागे, व्यक्तिरेखा यांचं जाळं विणत विणत जायचं तर तीन तासही कमीच पडतात. पण, नेमकं कथेतून काय सांगायचं याबद्दल स्पष्टता असती तर पूर्वार्धात अभिनेता प्रभासने साकारलेल्या भैरववार वेळ न दवडता गोष्ट अधिक वेगाने पुढे सरकली असती. भविष्यात घडणाऱ्या या कथानकासाठी उभारलेलं काशी शहर, कॉम्प्लेक्सची रचना, सुप्रीम यास्कीन या खलनायकाला दिलेलं आगळं रूप, काशी-शंभालातील सैनिक, त्यांच्या आकाशात उडणाऱ्या गाड्या, लेझरवाली शस्त्रं सगळं सगळं परीकथेतलं दिपवून टाकणारं विश्व व्हीएफएक्सच्या आधारे दिग्दर्शक नाग अश्विन यांनी उत्तम उभं केलं आहे.

# पलक तिवारीच्या फोटोवर सैफच्या लेकाची कमेंट, पण युजरच्या लक्षात येताच केली डिलीट



**मुंबई,** बॉलिवूड नवाब सैफ अली खान आणि अभिनेत्री अमृता सिंह यांचा मुलगा इब्राहिम अली खान मागील अनेक दिवसांपासून अफेअरच्या चर्चांमध्ये आहे. इब्राहिम अली खान अभिनेत्री श्वेता तिवारीची लेक पलक तिवारीला डेट करत असल्याचं बोललं जातंय. दरम्यार, पलक तिवारीने नुकतेच काही फोटो सोशल मिडियावर शेअर केले आहेत. पलक तिवारीने शेअर केलेल्या फोटोंवर नवाब कुटुंबाच्या लेकाने केलेल्या कमेंटनंतर अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. पलक तिवारीने सोशल मीडियावर फोटो शेअर करत, माझं मान्सून... अस कॅप्शन दिलं आहे. पलकने शेअर केलेल्या फोटोवर इब्राहिम अली खानने एक कमेंट केली होती. इब्राहिमच्या त्या कमेंटने अनेकांचं लक्ष वेधलं. इब्राहिमच्या कमेंटनंतर अनेक नेटकऱ्यांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत. काही नेटकऱ्यांनी कमेंट करत आधी करिअरमधे यशस्वी होण्याचं म्हटलं आहे. तर एकाने कमेंट करत आधी कामावर लक्ष देण्याचा सल्ला दिला आहे. पलकच्या फोटोतील बॅकग्राउंड पाहून अनेकांनी हे घर नवाब खान कुटुंबाचं वडिलोपर्जित घर पटौदी पॅलेस असल्याचा अंदाज लावला आहे. हे फोटो पटौदी पॅलेसच्या छतावरील असून इब्राहिमने काढले असल्याची सोशल मीडियावर चर्चा आहे. मागील अनेक दिवसांपासून इब्राहिम अली खान आणि पलक तिवारी दोघं एकमेकांना डेट करत असल्याची चर्चा आहे. मात्र दोघांनीही यावर कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही. पलकने एका मुलाखतीमध्ये दोघं केवळ चांगले मित्र असल्याचं म्हटलं होतं. पलक तिवारी आणि इब्राहिम अनेकदा एकत्र दिसतात. मुंबईच्या रस्त्यांवर दोघांचे एकत्र फोटो समोर आले असून त्यांच्या डेटिंगची चर्चा आहे. दरम्यान, पलक तिवारीने दबंग खान सलमानसोबत बॉलिवूड डेब्यू केला आहे. किसी का भाई किसी की जान या सिनेमातून पलकने इंडस्ट्रीत पदार्पण केलं. दुसरीकडे, इब्राहिम अली खान आगामी काळात सरजमी या सिनेमातून बॉलिवूडमधे पदार्पण करणार आहे.

# एनपीएव्ही नेट प्रोटेक्टरद्वारे सायबर सुरक्षा परिषदेने ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत हेल्पलाइनदेखील सुरू केली



देशात सायबर हल्ल्यांचे प्रमाण वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी कोणती सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे, याविषयी माहिती देण्यासाठी व त्यांना शिक्षित करण्यासाठी 'एनपीएव्ही नेट प्रोटेक्टर' या कंपनीने सायबर सुरक्षा परिषदेचे आज आयोजन केले. मुंबई परिसरातील ३०० हून अधिक आयटी व्यावसायिक, सिस्टीम इंटिग्रेटर्स, सोल्यूशन प्रदाते आणि नेटवर्क सुरक्षा तज्ज्ञ या परिषदेत सहभागी झाले होते. एनपीएव्ही नेट प्रोटेक्टर ही कंपनी गेल्या तीन दशकांपासून अँटीव्हायरस आणि इंटरनेट सुरक्षा उपाय यांमध्ये अग्रगण्य प्रदाता आहे. सायबर गुन्ह्यांच्या वाढत्या धोक्याची दखल घेऊन, 'एनपीएव्ही नेट प्रोटेक्टर'ने मुंबई आणि महाराष्ट्रातील ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत हेल्पलाइनदेखील सुरू केली आहे. ही हेल्पलाइन ईमेल, व्हॉट्सएप आणि फोन कॉल्सद्वारे सायबर गुन्हेगार आणि हॅकर्सपासून संरक्षण करण्यासाठी मार्गदर्शन देते. आपले मोबाइल डिव्हाइस व लॅपटॉप कसे सुरक्षित करायचे, संशयास्पद संदेश कसे ओळखायचे आणि सायबर गुन्हेगारीच्या नव्या युक्त्यांबद्दल अपडेट्स कसे मिळवायचे हे ज्येष्ठ नागरिक येथे शिकू शकतात. मोबाइल उपकरणे, सर्व्हर, लॅपटॉप आणि संगणक यांवर सायबर हल्ले होत असतात, ते आधुनिक पद्धतीने कसे केले जातात, याची माहिती या परिषदेमध्ये देण्यात आली. 'एनपीएव्ही नेट प्रोटेक्टर'ने स्वतः विकसीत केलेल्या एन्डपॉईंट सिक्युरिटी सोल्युशन्सचे यावेळी प्रदर्शन मांडण्यात आले. यांमध्ये केंद्रीकृत व्यवस्थापनासाठी 'ईपीएस वेब कन्सोल, कर्मचाऱ्यांच्या उत्पादकतेचे निरीक्षण करण्यासाठी 'अॅटोमिक टाईम, डाटा संरक्षणासाठी 'क्रिप्टॉन एन्टरप्राईज बॅकअप' आणि सुव्यवस्थित आयटी ऑपरेशन्स व वाढीव सुरक्षेसाठी 'आयटी प्रो मॅनेज' या साधनांचा समावेश होता. 'नेट प्रोटेक्टर'चे मुख्य कार्यकारी अधिकारी व सह-संस्थापक सुमीत केला म्हणाले, एकीकडे तंत्रज्ञानात मोठी प्रगती होत आहे आणि दुसरीकडे व्यक्ती व व्यवसाय हॅकिंग, डेटा ब्रीच आणि आर्थिक फसवणूक यांना बळी पडत आहेत. एनपीएव्ही नेट प्रोटेक्टरमध्ये आम्ही जगभरातील लाखो वापरकर्त्यांचे संरक्षण करणारे सुरक्षा उपाय विकसित करण्यासाठी कटिबद्ध आहोत. प्रत्येकासाठी सुरक्षित ऑनलाइन वातावरण निर्माण करणे हे आमचे ध्येय आहे. 'एनपीएव्ही नेट प्रोटेक्टर'च्या या सोल्युशन्सना बड्या खासगी कंपन्या, सरकारी एजन्सी, पायाभूत सुविधांची महत्त्वाची ठिकाणे आणि संरक्षण विभाग यांच्या विश्वासार्हतेचे बळ लाभले आहे. विन्डोज सर्व्हर्स, विन्डोज १०/११, मॅकबुक्स व लिनक्स यांसह सर्व ऑपरेटिंग सिस्टीम्सचा सायबर धोक्यांपासून बचाव करण्याच्या दृष्टीने 'एनपीएव्ही नेट प्रोटेक्टर'ने ही सोल्युशन्स डिझाइन केलेली आहेत.

# दुहेरी भूमिकेत गुलशन देवैय्या



निवडक भूमिकांमधूनही प्रेक्षकांच्या लक्षात राहिलेल्या तरुण कलाकारांमध्ये गुलशन देवैय्या हे नाव नेहमी घेतलं जातं. ओटीटीवर विविध वेबमालिकांमधून तो सातत्याने प्रेक्षकांसमोर येतो आहे किंबहुना या माध्यमावरचा आश्वासक चेहरा म्हणून तो ओळखला जातो. गुलशन पुन्हा एकदा बॅड कॉप या मालिकेतून प्रेक्षकांसमोर आला आहे. या मालिकेत तो पहिल्यांदाच दुहेरी भूमिकेत दिसणार आहे. या वेबमालिकेत दुहेरी भूमिका करायला मिळणार हे ऐकूनच त्यासाठी होकार दिला होता, असं गुलशनने लोकसत्ताशी बोलताना सांगितलं. आदित्य दत्ता दिग्दर्शित, अनुराग कश्यप, गुलशन देवय्या आणि हरलीन सेठी अभिनित बॅड कॉप या वेब मालिकेत नव्वदच्या दशकातील कथानक दाखवण्यात आलं आहे. बॅड कॉप ही वेब मालिका डिस्ने प्लस हॉटस्टारवर २१ जून रोजी प्रदर्शित झाली असून त्याचे तीन भाग प्रेक्षकांच्या भेटीला आले आहेत. या वेबमालिकेतील त्याच्या भूमिकेविषयी बोलताना अर्जुन आणि करण या दोन भावांची कथा यात असल्याचं त्याने सांगितलं. करण हा पोलीस अधिकारी आहे. त्याची पत्नी देविकासुद्धा पोलीस आहे. त्यांना एक लहान मुलगी आहे. मात्र एका प्रकरणाचा माग घेत असताना करण गायब होतो आणि त्याची जागा मुळात गुंड असलेला त्याचा भाऊ अर्जुन घेतो. करणचं हरवणं, अर्जुनने त्याची जागा घेणं, काझबे या गँगस्टरशी त्याचा सामना होणं अशी कथेतली गुंतागुंत आणि रहस्य वाढत जातं, असं तो म्हणतो. दिग्दर्शक आदित्य दत्ता यांनी कथा सांगितल्यावरच मी होकार दिला होता. एकतर दुहेरी भूमिका, त्यातून पोलीस अधिकाऱ्याची भूमिका साकारणं हे आव्हान आणि आनंद दोन्हींचा अनुभव देणारं असल्याने ही मालिका स्वीकारल्याचं त्याने सांगितलं.

# 'एका भूमिकेसाठी तुला काही जणांसोबत झोपावं लागेल'



मुंबईः अभिनेत्री सई ताम्हणकर तिच्या विविधांगी कलाकृतींसाठी ओळखली जाते. मराठीसह हिंदीत तिने उल्लेखनीय कामगिरी करत प्रेक्षकांचे मन जिंकून घेतले आहे. अभिनय क्षेत्रातील कामाशिवाय अलीकडच्या काळात तिने स्वःचे घर खरेदी केली, नवी गाडी घेतली आणि एवढंच नव्हे तर स्वतःचे कपड्यांचे मर्चंडाइजही लाँच केले. आज यशाच्या शिखरावर असणाऱ्या सईसाठी मनोरंजनविश्वात यशस्वी होण्याचा प्रवास सोपा नव्हता. तिला एका विचित्र कास्टिंग काऊच अनुभवाचा सामना करावा लागला होता. सईने एका मुलाखतीमध्ये बोलताना सांगलीहून मुंबईत प्रवास करताना आलेला एक विचित्र अनुभव सांगितला. ती म्हणाली की एकेरात्री ती सांगलीहून मुंबईत बसने प्रवास करत होती. तिने असे सांगितले की, 'मी सीटवर बसले होते आणि माज्या मागे एक मुलगा बसलेला. त्याचा हात मागून माज्यापर्यंत आला, त्याने माज्या खांद्याला हात लावला. मी घाबरले आणि विचार केला की हा कोणाचा हात आला? मी त्याचा हात पकडला, जोरात ओढला आणि मुरगळला. त्याला सांगितलं, पुन्हा जर हा हात आला ना, तर हात वेगळा मिळेल.' सई म्हणाली की त्याच्या तोंडातून अक्षरशः किंकाळी निघाली. तिने असेही म्हटले की तिला कोणाचीही भीती नाही. शिवाय मुंबईत जर असा काही प्रकार घडताना दिसला, तर मुंबईकर मदत करायला येतात असंही ती म्हणाली. यावेळी बोलताना तिने इंडस्ट्रीमध्ये आलेल्या एका कास्टिंग काऊचच्या अनुभवाविषयीही भाष्य केले. हॉटरफ्लायला दिलेल्या मुलाखतीमध्ये सई बोलत होती. सईने कधी कास्टिंग काऊचचा सामना केला आहे का, याविषयी विचारले असता ती म्हणाली की, 'खरोखर असं घडलंय की नाही हे सिद्ध करणं जेव्हा कठीण होतं, तेव्हा असा प्रकार एकदा घडला होता. तेव्हा मला एका व्यक्तीने असे म्हटलेले की, अशी एक भूमिका आहे पण त्यासाठी तुम्हाला काही जणांसोबत झोपावे लागेल. मी त्याला म्हटलं की हा मेसेज तू तुज्या आईला फॉरवर्ड कर, वडिलांना पाठव, पण मला पुन्हा कधीच मेसेज किंवा कॉल करू नको'. अभिनेत्रीने सांगितले की तिच्यासोबत असा अनुभव १५-२० वर्षात पहिल्यांदाच आणि एकदाच घडला होता. ती म्हणाली की हे सगळं खरोखर घडलं हे सांगणं किती कठीण आहे, कारण समोर कोण आहे आणि कोण मेसेज करतंय याबद्दल काहीही माहीत नसतं.

# कर्करोगाचं निदान झाल्यानंतर आता हिना खानची नवी पोस्ट चर्चेत



ये रिश्ता क्या कहलाता है या मालिकेतून प्रसिद्धीझोतात आलेली अभिनेत्री हिना खान सध्या चर्चेत आहे. गेल्या काही दिवसांपासून हिनाच्या आजाराबद्दल सगळीकडे अफवा पसरली होती आता यावर शिक्कामोर्तब करत अभिनेत्रीने ही बातमी खरी असल्याची पुष्टी दिली आहे. हिना खानला तिसऱ्या टप्प्यातील कर्करोग झाला आहे. हिना या आजाराशी झुंज देत असून तिने यावरील उपचारांना सुरूवातदेखील केली आहे. हिनाने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करून याबाबत सगळ्यांना कल्पना दिली होती. आता आयुष्यातील हा खडतर टप्पादेखील निघून जाईल असं म्हणत हिनाने एक नवीन पोस्ट शेअर केली आहे. हिनाने तिच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर कर्करोग झाल्याची माहिती दिल्यानंतर आता चाहत्यांबरोबर एक पोस्ट शेअर केली आहे. हा टप्पादेखील निघून जाईल असं कॅप्शन देत अभिनेत्रीने ही पोस्ट शेअर केली आहे. पोस्ट शेअर करत तिने स्माईली आणि हार्टच इमोजी वापरलं आहे. या आजारावर मात करण्याचा दृढनिश्चय दाखवत हिनाने रणबीर कपूरच्या संजू चित्रपटातील कर हर मैदान फतेह या गाण्याचा वापर करत ही पोस्ट शेअर केली आहे. शुक्रवारी २९ जून रोजी अभिनेत्रीने तिच्या इन्स्टाग्रामवर या आजाराबाबत सगळ्यांना माहिती देत पोस्ट शेअर केली आणि गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या या अफवांना अभिनेत्रीने पूर्णविराम दिला. हिनाला स्तनांचा कर्करोग झाल्याची माहिती तिने तिच्या चाहत्यांना दिली. यादरम्यान ती बरी आहे आणि या आजारावत मात करण्यासाठी लागणारे उपचारदेखील तिने सुरू केले आहेत असंही ती म्हणाली. या कठीण काळात तिचे कुटुंबीय खंबीरपणे तिच्या पाठिशी उभे आहेत असंही हिनाने नमूद केलं. हिनाच्या आजाराबाबत कळल्यानंतर अनेक चाहत्यांनी तसेच सेलिब्रिटींनी तिला लवकरात लवकर बरं होण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# जिल्ह्यात होणार ! सर्व सोयुक्त अध्यायावत उद्योग भवन

## धनंजय मुंडेंची मागणी मित्र उदय सामंतांनी केली पूर्ण



शासन निर्णय निर्गमित; मुंडेंनी मानले उदय सामंत यांचे आभार

**मुंबई (बातमीपत्र**

केंद्र व राज्य शासनाच्या औद्योगिक विकासाच्या धोरणाला अनुसरून बीड जिल्ह्यामध्ये उद्योग उभारणी बाबतच्या सर्व सेवा सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध व्हाव्यात या दृष्टीने जिल्ह्याचे अध्ययवत व सर्व सोयी युक्त असे उद्योग भवन असावे, याबाबतची मागणी जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांच्याकडे केली होती, आपल्या मित्राची मागणी उदय सामंत यांनी मान्य केली असून बीड जिल्ह्यात सर्व सोयुक्त अध्यायावत उद्योग भवन उभारण्यासाठी 14 कोटी 70 लाख रुपयांच्या आराखड्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील उद्योजकांना एकाच ठिकाणी उद्योग उभारणी बाबतच्या सर्व सेवा मिळाव्यात या दृष्टीने हे उद्योग भवन अत्यंत उपयुक्त ठरणार असून पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या मागणीला अनुसरून सात जून रोजी झालेल्या बैठकीत उदय सामंत यांनी याबाबतचा प्रस्ताव मागवला होता.

सदर उद्योग भवन हे सर्व सोयींनी युक्त तसेच संपूर्णपणे सौर उर्जेवर निर्भर असणार आहे, बांधकाम फर्निचर यासह विविध सुविधांसाठी एकूण 14 कोटी 69 लाख 28 हजार रुपये इतका निधी खर्च करण्यास शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून याबद्दल धनंजय मुंडे यांनी राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांचे आभार मानले आहेत.



उद्योग भवन उभारणीसाठी 14 कोटी 70 लाख रुपयांच्या आराखड्यास प्रशासकीय मान्यता प्रदान

# संस्था चालकाला धमकी







**सोनपेठ : प्रतिनिधी**

सोनपेठ तालुक्यातील एका संस्थेच्या मुख्याध्यापक तसेच इतर कर्मचारी यांना जीव मारण्याच्या धमक्या देऊन दहा लाखाची खंडणी मागणाऱ्या इसमावर गुन्हा दाखल करण्याची मागणी होत आहे. सोनपेठ तालुक्यातील मुन्सीराम तांडा येथील कै मानसिंग नाईक इंग्रजी प्राथमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथील मुख्याध्यापक अशोक अंकुशराव जाधव यांनी सोनपेठ पोलिसात तक्रार दिली असून मुळे नामक इसमाने शाळेत येऊन तसेच फोन वरून शाळेतील मुलीच्या बस तसेच इतर माहिती संदर्भात दहा लाख रुपयांची खंडणीची मागणी केली. तसेच खंडणी नाही दिली तर सर्वांना जीव मारण्याच्या धमकी देखील दिली आहे.

याबाबत मुख्याध्यापक अशोक जाधव यांनी सोनपेठ पोलीस स्टेशन येथे येऊन मुळे याच्या विरुद्ध लेखी तक्रार दिली असून त्याच्या पासून शाळा व्यवस्थापन तसेच विद्यार्थ्यांच्या जीविताला धोका असल्याचे तक्रारीत नमूद केले आहे. याबाबत सोनपेठ पोलीस यावर काय कारवाई करतात याकडे लक्ष लागले आहे. सध्या सर्वत्र विद्यार्थ्यावर अत्याचाराचे प्रकार गाजत असून यामध्ये असे प्रकार पुढे येत असल्यामुळे शैक्षणिक संस्था चालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



दि.08/10/2024

खंडणी व जिवे मारण्याची धमकी तक्रार अर्ज

प्रति,
मा.पोलिस निरीक्षक साहेब
पोलिस स्टेशन सोनपेठ जि.परभणी.

विषय :- खंडणी, अपहरण व जिवे मारण्याची धमकी दिल्याबद्दल

महोदय,

उपरोक्त विषयानुसार विनंती अर्ज करण्यात येतो की मी, श्री अशोक अंकुशराव जाधव मुख्याध्यापक कै.मानसिंग नाईक इंग्रजी प्राथमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मुंन्सीराम तांडा ता.सोनपेठ जि.परभणी मी तक्रार करीत आहे की,श्री.प्रशांत मुळे रा.सिंदगी बु.ता.अहमदपूर जि.लातूर हा कुख्यात गुंड दुपारी 12:30 वाजता शाळेत येवून 10 लाखाची खंडणी मागत होता. खंडणी आज संध्याकाळी 6:00 वाजेपर्यंत रक्कम नाही दिल्यास शाळेतील मुली शिकत असलेल्या मुली स्कुल बस मधून अपहरण करुन जिवे मारुन टाकतो. असे ऑफिस मध्ये येवून सांगत होता. नंतर 3.12, 3.13 व 3.14 मला मो.8605050051 या नंबर वरुन फोन केला आहे.

त्याने गाडी क्र. एमएच 55 बी 0190 या गाडी क्रमांकाने आलेला होता. त्याचे फोटो व सीसीटीव्ही मध्ये कैद आहेत. तरी मे साहेबांनी तात्काळ श्री.प्रशांत मुळे कुख्यात गुंडाचा साहेबांनी बंदोबस्त करावा या गुंडापासुन आम्हाला फार भिती वाटत आहे. शाळेतील कर्मचारी, मुले व मुली घाबरलेली आहेत. तरी या गुंडाचा तात्काळ तपास करुन जेर बंद करावे व कठोर कार्यवाही करण्यात यावे.

आपला
मुख्याध्यापक/प्राचार्य
[illegible]
मुंन्सीराम तांडा ता.सोनपेठ जि.परभणी
मो.8999190530

Scanned with CamScanner

# नांदेड-पनवेल गाडीच्या बोगींची संख्या वाढवून परळी मार्गे ईतर ठिकाणी रेल्वे सुरु करण्याची डीआरएम यांच्याकडे मागणी : जी. एस. सौंदळे

**परळी वैजनाथ/प्रतिनिधी**

द्वादश पंचम ज्योतीर्लिंग श्री.वैद्यनाथ क्षेत्र परळी मार्गे पुणे- पनवेल जाणा-या नांदेड एक्सप्रेस रेल्वे गाडीच्या प्रवाशी व स्लीपर तसेच ए.सी.बोगींची संख्या तात्काळ वाढवून या रेल्वेने दाटीवाटीने प्रवास करणा-या प्रवाशांची गैरसोय तात्काळ दुर करून परळी मार्गे पुणे,मुंबई,नागपुर,तिरूपती,अयोध्या,वाराणसी,गोवा व ईतर ठिकाणी रेल्वे सुरू करण्याची मागणी दक्षिण मध्य रेल्वेचे विभागिय व्यवस्थापक श्री.भरतेशकुमार जैन परळी रेल्वे स्थानक येथे तपासणीनिमित्त बुधवार दि.9 ऑक्टोंबर रोजी आले असताना रेल्वे प्रवाशी संघटनेचे अध्यक्ष जी.एस.सौंदळे यांच्यासह विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकारी व महाराष्ट्र प्रदेश प्रवासी महासंघ बीड जिल्हा व प्रवाशांच्यावतीने करण्यात आली. नांदेड-पनवेल रेल्वेगाडी च्या बोगी वाढवण्याच्या मागणीसह प्रवासी जनतेच्या व्यापक हिताच्या दृष्टीने काही महत्वपूर्ण मागण्या निवेदनात करण्यात आल्या यामध्ये 1)मछलीपट्टणम -बीदर, सिकंद्राबाद-बीदर इंटरसिटी,यशवंतपुर-बीदर एक्सप्रेस,पाटणा-पूर्णा,रायचूर-परभणी रेल्वे परळी-वैजनाथ पर्यंत त्वरीत विस्तारीत करावी. 2)दिवाळी सणानिमित्त परळी-वैजनाथ मार्गे सिकंदराबाद- छ.संभाजीनगर-मुंबई तसेच पुणे व ईतर ठिकाणी विशेष रेल्वे सुरू करावी. 3) 'पूर्णा-परळी' रेल्वे परत जाताना बहुअंशी रिकामीच असते त्या ऐवजी ती लातूर- धाराशिव किंवा उदगीर-बीदर पर्यंत विस्तारित करावी.

4)अमरावती -पुणे व कोल्हापुर नागपुर रेल्वे दररोज चालू कराव्यात 5)क्रॉसिंगच्या निमित्ताने घाटनांदूर,वडगाव (निळा) इत्यादी स्टेशन वर विविध गाड्या विनाकारण अधिक वेळ खोळंबून ठेवू नयेत,परळी रेल्वे स्थानकातील आरक्षण वेळ वाढवावी यासह ईतर मागण्या करण्यात आल्या यावेळी नगरसेवक चेतन सौंदळे,प्रवासी महासंघ बीड जिल्हा संघटक सुधीर फुलारी सर,विजयाताई दहीवाळ,सत्यनारायण दुबे,माजी नगरसेवक सोमनाथ निलंगे,मकरंद नरवणे,कैलास तांदळे,राजेश कांकरिया,दै.लोकमत चे तालुका प्रतिनिधी पत्रकार संजय खाकरे,रमणीक पटेल,चंदूअण्णा हालगे,शिरीष सलगरे,हिरालाल बोरा,अनिल मिसाळ,आदिंची उपस्थिती होती.परळी मार्गे विविध ठिकाणी रेल्वे सुरू करणे तसेच पिट लाईन यंत्रणा व रेल्वे स्थानकात अद्यावत सुविधा निर्माण करण्याचे काम रेल्वे विभागामार्फत करण्याचे सकारात्मक आश्वासन शिष्टमंडळास डीआरएम श्री. जैन यांनी दिले.




## बदलापूरनंतर आणखी एक घटना सोनपेठ येथे चिमुरडीवर अत्याचार !

## मुलींवरील अत्याचाराच्या घटना कधी थांबतील

सोनपेठ प्रतिनिधी : आशिष मुंढे

सोनपेठ शहरातील एका इंग्रजी शाळेत 5 वर्ष वयाच्या चिमुकलीवर अत्याचार झाल्याची तक्रार मुलीच्या आईने सोनपेठ पोलीस ठाणे येथे दि 7 ऑक्टोबर रोजी दाखल केलेली आहे या तक्रारीनुसार सोनपेठ पोलीस ठाणे येथे पोस्को, व इतर कलमान अंतर्गत संबंधित आरोपीचे विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

पीडित मुलीच्या आईच्या तक्रारी नुसार मुलगी दिनांक 5 ऑक्टोबर रोजी शाळेतून घरी आल्यानंतर तिला चालण्यास बसण्यास त्रास होत होता. व ओरखडलेल्या जखमा होत्या. म्हणून त्यांनी दवाखान्यामध्ये मुलीला उपचारासाठी नेले असता संबंधित डॉक्टरांनी मुलीवर अत्याचार झाल्याचे कारण दाखवत पुढील उपचारासाठी पाठवले. घटनेची माहिती समजताच पोलीस अधीक्षक रवींद्र परदेशी, अप्पर पोलीस अधिक्षक यशवंत काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी समाधान पाटील, पोनि. सुर्यमोहन बोलमवाड आदींनी घटना स्थळी भेट दिली.या प्रकरणात संबंधित पीडित मुलीच्या आईने तक्रार दाखल केलेल्या प्रकरणात सोनपेठ पोलीस ठाणे व परभणी जिल्हा पोलीस प्रशासन यांनी 6 वेगवेगळ्या विषय तज्ज्ञांचे पथके नेमून तपास यंत्रणा कार्यरत केलेली आहे. या प्रकरणाचा तपास सोनपेठ पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक बोलमवाड व सर्व वरिष्ठ पोलीस अधिकारी,कर्मचारी, तपास कामी कार्यरत आहेत.




# सामुदायिक दसरा महोत्सव समितीच्या वतीने विविध क्षेत्रात कामगिरी करणाऱ्यांचा गौरव

**लातूर प्रतिनिधी**

सामुदायिक दसरा महोत्सव समिती लातूरच्या वतीने ५२ व्या दसरा महोत्सवानिमित्त सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा विषयक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या दुर्लक्षित उपेक्षित महिला व पुरुषांसह युवकांचा शनिवार दि.१२ ऑक्टोंबर २०२४ रोजी दुपारी ४ वाजता लातूर येथील आर्यसमाज, गांधी चौक, लातूर येथे दसरा महोत्सव समितीचे स्वागताध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते पुरस्कार देवून गौरव करण्यात येणार असल्याची माहिती दसरा महोत्सव समितीचे शहर अध्यक्ष ईश्वरजी बाहेती, ग्रामीण अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

महर्षी दयानंद व्यायाम व क्रीडा मंडळ लातूरच्या वतीने गेल्या १९७० साला पासून सुरु असलेला सामुदायिक दसरा महोत्सव या उपक्रमाचा यावर्षीचा ५२ वा उत्सव साजरा करण्यात येत असून लातूर शहर आणि परिसरातील सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातील कलागुणांचा विकास व्हावा यासाठी विविध मंडळ अनेक उपक्रमातून कार्य करीत आहेत. या कार्याची दखल घेवून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिला पुरुष कार्यकर्त्यांना दसरा महोत्सव समितीचे स्वागताध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते महर्षी दयानंद सांस्कृतिक रक्षक पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे.



पुरस्कार सोहळ्यानंतर सामुदायिक दसरा महोत्सव समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य दिव्य शोभायात्रेला मान्यवरांच्या हस्ते केशरी ध्वज दाखवून प्रारंभ करण्यात येणार आहे. सदरील शोभायात्रा गांधी चौक, जुने बस स्थानक, हनुमान चौक, सुभाष चौक, गंजगोलाई, अण्णाभाऊ साठे चौक, शाहू चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे या शोभायात्रेचा यशवंत विद्यालयाच्या मैदानावर समारोप होईल. यावेळी खेळाच्या विविध स्पर्धा व चित्त थरारक प्रदर्शन होऊन या स्पर्धेतील आणि शोभायात्रेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कलाकारांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार व प्रमाणपत्र शाल श्रीफळ देऊन सन्मान करण्यात येईल.

स्वागताध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड यांच्यासह इतर मान्यवरांच्या मनोगतानंतर सोने-चांदी वाटप करुन समाज बांधवांसोबत गळाभेट घेत बंधुभाव राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देवून कार्यक्रमाचा समारोप होणार आहे. तेंव्हा सामुदायिक दसरा महोत्सव समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमात लातूर शहर आणि परिसरातील सर्व स्तरातील नागरिक, महिला, पुरुष आणि तरुणांनी बहुसंख्येने सहभागी व्हावे असे आवाहन दसरा महोत्सव समितीचे ग्रामीण अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर, शहर अध्यक्ष ईश्वर बाहेती, उपाध्यक्ष विष्णूभुतडा, कार्याध्यक्ष जयप्रकाश दगडे, सरचिटणीस व्यंकटेश हालिंगे, शंकरराव मोरे, वैजनाथआप्पा लातूरे, डॉ. हनुमंत कोळेकर, राजाराम ठाकूर, श्रीकांत रांजणकर, संतोष तोष्णीवाल, महावीर काळे, दिलीप कानगुले, ॲड. राणीताई स्वामी, ॲड. राधिकाताई पाटील, योगितताई ठाकूर, अमोल नान्नजकर, ओमप्रकाश पराशर, भारत माळवदकर, ॲड. विजयकुमार सलगरे, ॲड. शिवलिंगअप्पा कुरे, सुरेश गोजमगुंडे, दगडूसाहेब पडिले, अशोक पवार, अजय रेड्डी, आकाश गडगिळे, विनोद रेड्डी, शिवराज पानगावे, नेताजी जाधव, रमाकांत बुरबुरे, अजय गोजमगुंडे, श्रावण रावणकुळे, लक्ष्मण दनाने, तुषार रेड्डी, आदित्य कासले, काशीबाई हांडे, जयश्री भुतेकर, रेखा खंदाडे , सुवर्णा नाईक, शीतल तम्मलवार, प्रीतीताई कोळी यांच्यासह अनेकांनी केले आहे.